पुढारी MY कोल्हापूर गुरुवार, २५ एप्रिल २०२४

# समाजात वावरताना विद्यार्थिनींनी सजग राहावे : डॉ. भाग्यश्री कुलकर्णी

**कोल्हापूर :** विद्यार्थिनींनी समाजामध्ये सजग राहावे, तसेच अचानक उद्भवणाऱ्या परिस्थितीचा धैर्याने मुकाबला करावा, असे आवाहन डॉ. भाग्यश्री कुलकर्णी यांनी केले. विवेकानंद ज्युनिअर कॉलेजमध्ये शाळा सिद्धी उपक्रमांतर्गत डॉ. कुलकर्णी यांचे 'लैंगिक छळ, गैरवर्तणूक' विषयावर विद्यार्थिनींसाठी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यु. आर. हिरकुडे होत्या. प्रा. गीतांजली साळुंखे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. माधवी देशपांडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एस. वाय. कंग्राळकर यांनी आभार मानले. प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. शिल्पा भोसले, प्रा. एम. ए. कुरणे, कॅप्टन सुनीता भोसले, प्रा. सहिदा कच्छी, रजिस्ट्रार आर. बी. जोग यांनी नियोजन केले.